पोलीस उप अधीक्षक कार्यालय ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद ★ सत्यमेव जयते

दिनांक ०७/०७/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक शिवाजी दामु गाडे, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर यांनी ५०००/- रु लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | शिवाजी दामु गाडे, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्याचे बक्षीस म्हणून. |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्याचे बक्षीस म्हणून आलोसे शिवाजी गाडे हे ५०००/- रुपये लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, शिवाजी गाडे, यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक ०७/०७/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे शिवाजी दामु गाडे, पोलीस हवालदार, नेमणुक- पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे उस्मानपुरा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. श्री. अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, कल्याण सुरासे, रवींद्र आंबेकर, पोशि अवील जाधव यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद,

